भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेल्या परिणामाचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या
आंतरविद्याशाखे अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध आराखडा

संशोधक
उज्जैन विठ्ठलराव पाईकराव

मार्गदर्शक
डॉ. भाऊसाहेब सोपान आंधळे

शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड, ता.जिल्हा. नांदेड

२०२३-२४

अनुक्रमणिका

अ. न.	विषय	पृष्ठ क्र.
I	मुखपृष्ठ	१
II	अनुक्रमणिका	२
१.	प्रस्तावना	३
२.	समस्या विधान	८
३.	संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या	८
४.	संशोधनाची उद्दिष्टे	९
५.	संशोधन परिकल्पना	१०
६.	संशोधनच्या शून्य परिकल्पना	१०
७.	संशोधनाची गृहितके	१०
८.	संशोधनाची गरज	११
९.	संशोधनाची महत्त्व	१२
१०.	संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा	१४
११.	संशोधन कार्यपध्दती	१५
१२.	संशोधनाची पध्दती	१५
१३.	संशोधन अभिकल्प	१६
१४.	संशोधन साधने	१६
१५.	माहिती विश्लेषणाची संख्याशास्त्रीय तंत्रे व परिमाणे	१६
१६.	जनसंख्या	१६
१७.	न्यादर्श	१७
१८.	प्रकरणीकरण	१७
१९.	संदर्भ ग्रंथ यादी	१८

संशोधन आराखडा

१. प्रस्तावना

शिक्षण म्हणजेच ज्ञान देणे एवढाच अर्थ नाही तर शिक्षणाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. महात्मा गांधीजींनी सुध्दा म्हटले आहे की 'मानवातील उत्कटतेचा शरीर, मन, आत्मा यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाने केवळ शारीरिक व बौध्दिक विकास न होता भावनिक आणि सामाजिक विकास व्हायला हवा. शिक्षणातून व्यक्तीचे सर्व गुण प्रकट होतात. व्यक्तीच्या अंगी असलेले विविध गुण हे शिक्षणामुळेच विकसित होतात. काही चित्रकार होतात तर काही डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी होतात म्हणजेच विविध व्यक्तींच्या विकासातून समाजाची जडणघडण होत असते. "Knowledge is virtue" सॉक्रेटिस, ज्ञान मनुष्य तृतीय नेत्रमं!, न हि ज्ञानेनं सदृश्यं पवित्र मिह विद्यते जगत !! (श्रीमदभगवत गीता) अर्थातच ज्ञानाशिवाय मनुष्य जगुच शकत नाही. "विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी!" ज्ञान मिळविणे ही आज काळाची गरज बनली आहे. आज ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झालेला आहे. या विस्फोटात अज्ञानी व्यक्ती आपले अस्तित्वच हरवून बसलेला आहे. ज्ञानाइतके पवित्र या जगात दुसरे काहीही नाही. शिक्षण म्हणजे आत्माविष्कार, व्यक्तिच्या आंतरिक शक्तींचा नैसर्गिक व गतिमान समतोल म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती आणि समाज समृद्ध, परिपूर्ण व स्वाभिमानी जीवन जगू शकत नाही.

मार्च २०२० मध्ये पार पडलेल्या राज्याच्या व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात घोषणा केल्यानुसार, शालेय शिक्षण विभागाने पहिल्या टप्प्यात राज्यामध्ये ३०० जिल्हा परिषद शाळा "आदर्श शाळा" म्हणून विकसीत करण्याचा निर्णय घेतला. काही निकषांच्या आधारावर साधारणतः प्रत्येक तालुक्यातून १ अशा ३०० शाळा निवडण्यात आल्या होत्या. निवडलेल्या आदर्श शाळा शक्यतो किमान इयत्ता १ ली ते ७ वी वर्गाच्या जिल्हा परिषद शाळा असतील व गरज पडल्यास त्यात इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्यात येतील असे परिपत्रक दिनांक २६ ऑक्टोंबर २०२० रोजी काढण्यात आले.

त्या अनुषंगाने राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर यादी अंतिम करण्यासाठी त्यातील निवडलेल्या शाळांची पुष्टी करावी व १५ दिवसांच्या आत कळवावे. एकंदर आदर्श शाळांची यादी निश्चित झाल्यानंतर, सर्व शासकीय, जिल्हास्तरीय व ग्रामस्तरीय योजनांचे Convergence करुन सदर शाळांना विकसीत करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. "आदर्श शाळा" म्हणजे काय ? त्याचे निकष व परिभाषा काय अपेक्षित आहेत, या बाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण करण्यात आले.

आदर्श शाळा निर्मितीमध्ये तिन महत्वाचे भाग म्हणजे त्यामध्ये भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता आणि काही प्रशासकीय बाबींचा समावेश करण्यात आला.

आदर्श शाळामधून २१ व्या शतकातील कौशल्य व नवनिर्मीतीला चालणा देणारे, समिक्षात्मक विचार, वैज्ञानिक प्रगती, संविधानिक मुल्ये अंगी बाणविणे, सोबत काम करण्याचे कौशल्य, संभाषण कौशल्य यासारखी अन्य कौशल्य जाणिवपूर्वक विकसीत करण्याच्या दृष्टीने विचार करण्यात आला.

आदर्श शाळांकडे लोक आकर्षित होऊन इतर शाळा सोडून या शाळेत आपल्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाठविण्यास तयार होतील. पालक व व्यक्तिमत्व विकासासाठी विविध शालेय व सहशालेय उपक्रमात सहभाग घेण्यासाठी तयार असणे हे आदर्श शाळांचे वैशिष्टे दर्शविते.

आदर्श शाळांमध्ये वातावरण प्रसन्न असावे, विद्यार्थ्यांना शाळेत यावेसे वाटावे, विद्यार्थ्यांना शनिवार आणि रविवार शाळेत यावेसे वाटले पाहिजे. मुलांना आनंददायी

शिक्षणाचा अनुभव मिळेल. आदर्श शाळांमध्ये विद्यार्थ्यांना कृतियुक्त शिक्षणातून स्वतःला ज्ञानाची निर्मिती करता येईल. शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासाला प्रयत्नपुर्वक वाव देण्यात येईल. विविध क्षेत्रात व अन्य विषयात प्राविण्य मिळवून देणारी तसेच विविध क्षेत्रात कौशल्य विकसित करणारी शाळा म्हणजे "आदर्श शाळा" होय.

वरील बाबींची पुर्तता करणाऱ्या शाळेस 'आदर्श शाळा' म्हणून संबोधण्यात येईल. अशा प्रकारच्या राज्यातील प्रत्येक तालुक्यातून साधारणतः एक शाळा समृध्द करणे. सदर शाळा अन्य शाळांना प्रेरणा व मार्गदर्शन करण्याचे काम करेल. तसेच राष्ट्रिय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP) मध्ये नमुद 'School Complex' या संकल्पनेप्रमाणे जवळच्या अन्य शाळांतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना या शैक्षणिक सोयी सुविधांचा लाभ घेता येईल. या शाळांची गुणवत्ता, मुलांची शैक्षणिक प्रगती, शिकण्याची गती, त्यांचे सामाजिकीकरण, त्यांचा होणारा सर्वकष व्यक्तिमत्व विकास पाहून अन्य शाळांमधील पालक त्यांच्या मुलांना अशा समृध्द शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतील. भविष्यात टप्प्या-टप्प्यात मुलांना वाहतूक सुविधा उपलब्ध करण्याचे सुध्दा नियोजन असेल.

विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी ताण विरहीत वातावरण मिळावयास हवे, पाठ्यपुस्तक व दप्तरातील साहित्याच्या पलीकडे जावून त्यांना शाळेत, शाळेच्या परिसरातील उपलब्ध साधन सामुग्रीमधूनही विविध विषयातील ज्ञान अवगत करता यावे याकरीता त्यांच्यासाठी प्रत्येक शनिवारी "दप्तर मुक्त शाळा" हा उपक्रम आदर्श शाळेच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविण्यात येईल, निवडण्यात आलेल्या "आदर्श शाळांची" उपरोक्त निकषांच्या आधारे पडताळणी करुन त्यात काही बदल असल्यास ते दिनांक ०६ नोव्हेंबर २०२० पर्यंत कार्यालयास कळवावे या बाबतचे परिपत्रक काढण्यात आले होते.

दिनांक ०५ मार्च २०२१ च्या शासन निर्णयानुसार, मा. उपमुख्यमंत्री यांनी सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात त्यांच्या भाषणामध्ये राज्यात १५०० शाळा "आदर्श शाळा" म्हणून विकसीत करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार प्रथम टप्प्यात ३०० शाळांची यादी आदर्श शाळा म्हणून विकसीत करण्यासाठी अंतिमरित्या जाहीर करण्यापूर्वी दि. २६ ऑक्टोंबर २०२० च्या परिपत्रकान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अभिप्राय घेण्यासाठी जाहिर करण्यात आली. तथापी त्यानंतर लोकप्रतिनिधी, मु.का.अ. जिल्हा परिषद तसेच शाळांकडून देखील वरील यादीतील शाळा बदलणे किंवा नविन शाळा समाविष्ट करण्याची मागणी / सुचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच महाराष्ट्र आंतर राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या ८१ शाळा कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, शासकीय विद्यानिकेतन व नागरी भागातील शाळा यांचा समावेश सदर यादीत करण्याची आवश्यकता होती. सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन प्रथम टप्प्यात ५०० शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यासाठी शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या ८१ शाळा, कस्तुरबा गांधी बालीका विद्यालये, शासकीय विद्यानिकेतन व नागरी भागातील शाळा यांचा समावेश करुन प्रथम टप्यात ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसीत करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर आदर्श शाळांमध्ये खालील प्रमाणे सुविधा उपलब्ध असाव्यात, वाढता लोकसहभाग, भविष्यात वाढती पटसंख्या, किमान १००-१५० पटसंख्या, शालेय प्रांगणात अंगणवाडी (पुर्व प्राथमिक वर्ग), आकर्षक इमारत, विद्यार्थ्यांनुसार वर्ग खोल्या, मुला-मुलींकरिता व CWSN (Child with Special Need) साठी स्वतंत्र पुरेशी स्वच्छतागृहे, पेयजल सुविधा व हॅन्ड वॉश स्टेशन, मध्यान्ह भोजनाकरीता स्वयंपाकगृह व भांडार कक्ष, शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य, ग्रंथालय / वाचनालय, संगणक कक्ष, Virtual Classroom ची सुविधा, शाळेला संरक्षक भिंत, आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून शाळेतील Fire Extinguisher सह Emergency Exit ची उपलब्धता, परिसरातील शाळेमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वाहतुक व्यस्था उपलब्ध करणे, उत्कृष्ट शिक्षकांना देशांतर्गत / देशाबाहेर पाठविणे. इयत्ता ५ वी स्कॉलरशिप परीक्षेची तयारी करुन घेणे.

सदर आदर्श शाळांमध्ये वरील सुविधा शासकीय निधीशिवाय CSR व लोक सहभागातून उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच सर्व शासकीय, जिल्हा स्तरीय व ग्रामस्तरीय योजनांचे एकत्रिकरण करुन सदर शाळा विकसित करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. त्या अनुषंगाने शाळांचे सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आणि अर्पण फाऊंडेशन मुंबई यांच्यामध्ये करार करण्यात आला. त्या माध्यमातून जिल्हा स्तरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळेतील सर्व शिक्षकांसाठी बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा या विषयावर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मध्ये प्रशिक्षण देण्यात आले. शासन निर्णयानुसार राज्यात राबविल्या जाणाऱ्या योजनेला "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना" असे नाव देण्यात आले आहे. नांदेड, लातूर, हिंगोली, परभणी जिल्हयाअंतर्गत ५८ आदर्श शाळांमधील २०० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

अर्पण फाऊन्डेशनची स्थापना १९६५ मध्ये करण्यात आली. भारतातील बाललैंगिक अत्याचार (CSA) च्या निर्मुलनासाठी काम करणारी ही जागतिक स्तरावील मान्यताप्राप्त, पुरस्कार प्राप्त संस्था आहे. जी मुले आणि प्रौढांसाठी CSA प्रतिबंध आणि हस्तक्षेप सेवा प्रदान करते. अर्पण हा भारतातील CSA प्रतिबंध आणि हस्तक्षेपाच्या क्षेत्रात एक प्रमुख आयाज आहे आणि स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घोरण आणि पध्दतशीर बदल घडवून आणण्यासाठी वकिली आणि संशोधनाचा वापर करतो.

अर्पण हा CSA क्षेत्रातील जागतीक विचारसरणीचा नेता आहे. ज्यात नाविण्यपूर्ण प्रभावी मॉडेल आहेत. जे लहान मुले आणि पालकांपासून ते राज्य आणि शिक्षकापर्यंत अनेक भागधारका सोबत काम करतात.

अर्पणचा मुख्य प्रकल्प शाळांमध्ये बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व वैयक्तिक सुरक्षा शिक्षणावर लक्ष केंद्रित करतो. मुले आणि किशोरांना (वय ४ ते १८) वैयक्तिक सुरक्षे बदल जागरुकता निर्माण करतो. जेणेकरुन ते असुरक्षीत परिस्थिती ओळखू शकतील आणि मदत घेऊ शकतील. अर्पण शिक्षक आणि पालकांना CSA रोखण्यासाठी आणि हाताळण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, वृत्ती आणि कौशल्ये यांचे प्रशिक्षण आणि सक्षमीकरण देखील करते. २००७ पासून अर्पणव्दारे १८.७ दसलक्ष मुलांना आणि प्रौढांना प्रभावित केले आहे आणि अर्पणच्या अनुकरणिय कार्यासाठी ०८ राष्ट्रीय आणि ०२ आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

विविध आयोगांच्या शिफारशी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

अध्ययन अध्यापन प्रभावी होण्यासाठी तंत्रज्ञानाधिष्ठीत अध्ययन अध्यापन पध्दतीचा वापर करण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत

राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८

भारताचे पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८मध्ये प्रसिध्द झाले ज्याच्या मुददा क्र ६ मध्ये तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा विविध शाखा मध्ये विखुरल्या जाव्यात ज्यामुळे तंत्रज्ञानाधिष्ठीत अध्ययन अध्यापनात वापर करण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत.

राष्ट्रीय शिक्षक आयोग १९८५

राष्ट्रीय शिक्षक आयेग १९८५ मध्ये प्रसिध्द झाले ज्या मध्ये अध्यापन व अध्ययनामध्ये सुधारीत पध्दती व तंत्रज्ञान वापराची शिफारस करण्यात आली आहे. (Naik, J. P. The Education Commission and After, New Delhi, 1982)

सुधारीत राष्ट्रीय शिक्षण धोरण १९९२

सुधारीत राष्ट्रीय शिक्षण धोरण १९९२ मध्ये प्रसिध्द झाले ज्या मध्ये तांत्रिक व्यवस्थापन शिक्षणाच्या सुविधा या विषयी शिफारशी केलेल्या आहेत. (भारतीय शिक्षण स्वरूप आणि समस्या : शिक्षणशास्त्र अभ्यासपत्रिका - मुंबई विदयापीठ मुंबई)

सर्व शिक्षा अभियान

सर्व शिक्षा अभियान **२००२ च्या मसुदयात** शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिफारशी करण्यात आल्या आहे. (https://smartnet.niua.org/content/fadb6c11-ddda-4019-a1e5-229bbc6fe852 Date : 25.12.2020)

अभ्यासक्रम आराखडा २००५

अभ्यासक्रम आराखडा २००५ मध्ये लैंगिक शोषणासंदर्भात विविध शिफारस करण्यात आली आहे. अध्ययन अध्यापन प्रभावी होण्यासाठी तंत्रज्ञानाधिष्ठीत अध्ययन अध्यापनाचा वापर करण्याच्या सुचना केलेल्या आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मुददा क्र ५.२४ नुसार बी.एड. च्या सर्व कार्यक्रमामध्ये अध्यापनशास्त्रातील कसोटीवर सिध्द झालेली तंत्रे तसेच नविन तंत्रे याच्या प्रशिक्षणाचा समावेश असेल. याचबरोबर पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, बहुस्तरीय अध्यापन आणि मूल्यांकन, दिव्यांग मुलांना शिकवणे, लैंगिक शोषणासंदर्भात शिफारशी करण्यात आल्या आहेत.

(https://dnyantar angini.com/2023/07/new-education-policy-2020-lets-know-50-things. html)

लैंगिक शोषणासंदर्भात विविध आयोगांनी वरील प्रमाणे शिफारशी मांडल्या आहेत.

सैध्दांतिक पार्श्वभूमी

मानसशास्त्राच्या स्वरूपाचा विचार करताना मानवी उत्क्रांतीमध्ये एकपेशीयुक्त सजींवापासून अनेक पेशीयुक्त सजीव व पुढे मानव प्राणी याची सध्यस्थिती याहीपुढे उत्क्रांती व विकास चालू असतानाच मेंदू व त्याच्याशी निगडीत प्रक्रिया व त्या प्रक्रियांवरील त्याचे नियंत्रण याच बरोबर मेंदूला व कृतीला प्रेरक ठरणारे मन यांच्या उत्क्रांतीमधील प्रथमिक टप्प्यांच्या स्वरूपातील गैंगलीया हा मेंदू अस्तित्वातील प्राथमिक भाग तर आजचा मानवी मेंदू हा उच्चतम टप्पा असून मनाचीही अशीच स्थित्त्यांतरांचे टप्पे घडलेली असणार आहेत.

वरील विचारांचा सविस्तर अभ्यास हा संशोधनाचा विषय होऊ शकतो येथे मानसशास्त्राचे स्वरूप पाहताना आपणास केवळ सजीवांचे त्यातही फक्त वनस्पती सोडून प्राण्यांतील मानवप्राण्याच्या वर्तनामागील प्रमुख कारण मेंदू-मन व त्यांच्याव्दारे घडणारी दृश्य कृती म्हणजेच घडणा-या वर्तनांचा अभ्यास करावयाचा असल्याने हा उददेश लक्षात घेता हिलगार्डची व्याख्या मानसशास्त्राचे स्वरूप चांगल्या प्रकारे स्पष्ट करू शकते.

संयोजनवादी उपपत्ती ः इ.एल. थॉर्नडॉईक

या उपपत्तीमधून संशोधिकेस जोपर्यत अध्ययन कर्त्याला शिकविल्यानंतर समाधान होत नाही तो पर्यत अध्ययनार्थी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार नाही. समाधान किंवा बक्षिसाशिवाय कोणताच प्रयत्न परिणामकारक होणार नाही यामुळेच अध्ययन प्रक्रियेत योग्य त्या बक्षिसाची तरतुद करण्यात आली असून इ.एल. थॉर्नडॉईक यांच्या मतानुसार अध्ययन प्रक्रियेत सरावाने अध्ययन तसेच अध्ययन प्रक्रियेत वापरलेली साधने, तंत्रे, विविध पध्दतीच्या वापराच्या परिणामकारकतेला महत्त्व आहे. ज्यामध्ये अध्ययन व अध्यापनासाठी मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या वापराच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी उपपत्ती उपयोगात आली.

अभिजात अभिसंधान उपपत्ती ः पाव्हलाव्ह

या उपपत्तीमधून संशोधिकेस प्राथमिक चेतक व दुय्यम चेतक प्रतिसादकात अपेक्षित प्रतिसाद वारंवार मिळवला असता काही काळानंतर दुय्यम चेतकाच्या सानिध्यात अपेक्षित प्रतिसाद मिळतो तेव्हा अभिजात अभिसंधानाची प्रक्रिया घडते. ज्यामध्ये अध्ययन व अध्यापनासाठी मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या वापराचा परिणाम अभ्यासण्यासाठी उपपत्ती उपयोगात आली.

साधक अभिसंधान ः स्किनर

या उपपत्तीमधून संशोधिकेस सरावाचा नियम व प्रतिसादाचा नियम उपयुक्त ठरला आहे. ही उपपत्ती मानवी अध्ययनासाठी उपयुक्त असून अशा प्रकारच्या अध्ययनात प्रतिसाद महत्त्वाचा ठरतो. वर्गात एकच शैक्षणिक साधन (चेतक) दर्शविला असता विद्यार्थी वेगवेगळा प्रतिसाद नोंदवीतात म्हणजेच चेतक एक प्रतिसाद अनेक अशी स्थिती निर्माण होते. ज्यामध्ये शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थी शिक्षकांची मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या वापराची सध्यस्थिती अभ्यासण्यासाठी उपपत्ती उपयोगात आली.

सामाजिक अध्ययन उपपत्तीः अल्बर्ट बांदुरा

या उपपत्तीमधून मनुष्याच्या भूतकाळातील वर्तनाचा परिणाम त्याच्या भविष्यातील वर्तनावर प्रामुख्याने होतो. मनुष्य केवळ चेतकाला अंधपनाने प्रतिसाद देत नाही तर तो चेतकाचा अर्थ लावतो आणि मगच त्याचा प्रतिसाद येतो. सामाजिक अध्ययन उपपत्ती ही दृढीकरणवादी व वर्तनवादी यांच्यातील सेतू समजला जातो. ज्यामध्ये शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थी शिक्षकांसाठी मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या वापराच्या परिणामकारकतेचा अभ्यास व सध्यस्थिती अभ्यासण्यासाठी ही उपपत्ती संशोधिकेस उपयोगात आली.

क्षेत्रीय उपपत्ती ः कर्ट लेविन

या उपपत्तीमधून संशोधिकेस प्रत्येक व्यक्तिचे क्षेत्ररचनेचे स्वरूप वेगळे असल्यामुळे त्याचे वर्तन व अध्ययन वेगवेगळया प्रकारे होते. व्यक्तिगत भेदांचेच हे स्वरूप आहे असे मानले तर शिक्षकाने या स्वरूपाच्या व्यक्तिभेदांचा अध्ययन व अध्यापन कार्यात विचार करावा व त्यानुसार ते कार्य करावे. वर्तनाच्या प्रेरणा सकारात्मक असतील तर ते वर्तन व्यक्ति सहजपणे व मनापासून करते. अध्यापन प्रक्रियेतून विद्यार्थ्यांच्या क्षेत्रीय रचनेतील ज्ञानात्मक अथवा बोधात्मक रचनेत फेरफार व ते ही योग्य दिशेने घडवून आणणे हे शिक्षकाचे कार्य महत्त्वाचे ठरते. ज्यामध्ये शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थी शिक्षकांसाठी मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या वापरामुळे अध्ययनात विविध मुक्त शैक्षणिक संसाधनांचा वापर करून त्याचा अध्ययनातील परिणामकारकतेच्या अभ्यासासाठी उपपत्तीचा उपयोग झाला.

पध्दतशीर वर्तन पध्दती ः कलार्क हल

पध्दतशीर वर्तन पध्दती या उपपत्तीनुसार ज्ञानाचे आकलन व दृढीकरण होण्यासाठी पूर्वानुभवाचा उपयोग होतो. म्हणून शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थी शिक्षकांसाठी मुक्त शैक्षणिक संसाधनांच्या वापरामुळे अध्ययनात ज्ञानाचे आकलन व दृढीकरण होण्यासाठी पूर्वानुभवाचा उपयोग झाल्याने अध्ययन परिणामकारक झाले की नाही हे अभ्यासण्यासाठी उपपत्तीचा उपयोग झाला.

म्हणूनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेल्या परिणामाचा अभ्यास संशोधकने केला आहे.

२. समस्या विधान

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेला परिणामाचा अभ्यास."

३. संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, कायदेपंडित, समाजसुधारक व थोर समाजसेवक म्हणजेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना :

शासनाची भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सुरु केल्याली महत्वकांक्षी योजना ज्यामध्ये भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता व प्रशासकीय कार्य संदर्भात असल्याली महाराष्ट्र शासनाची योजना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना होय.

आदर्श शाळा योजना :

शासनाची ही महत्वकांक्षी योजना असून यामध्ये भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता व प्रशासकीय बाबी या निकषांच्या आधारे निवड झालेल्या शाळा.

बाललैंगिक शोषण

शक्तीशाली असलेली एखादी व्यक्ती स्वतःच्या लैंगिक संतुष्टीकरीता बालकाचा वापर करुन घेत असेल तर त्यास बाललैंगिक शोषण असे म्हणतात.

प्रतिबंध

मज्जाव करणे संदर्भात संबंधातील पहिली वस्तु दुसऱ्या वस्तुचा संदर्भ देते असे म्हटले जाते त्याला दुसऱ्या वस्तुचे नाव म्हणतात.

प्रशिक्षक

बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तीगत सुरक्षा संदर्भात शिक्षकांना प्रशिक्षण देणारा शिक्षक म्हणजे प्रशिक्षक होय.

प्रशिक्षणार्थी

सामान्यतः तांत्रिक आणि उच्च अभ्यासक्रमातून पदवी प्राप्त केल्यानंतर संस्थेतील प्रशिक्षणार्थी कार्यक्रमात भाग घेणारी व्यक्ती म्हणून ओळखला जातो त्यास प्रशिक्षणार्थी असे म्हणतात.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळेतील शिक्षक की ज्यांना बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तीगत सुरक्षा संदर्भात प्रशिक्षण दिलेले आहे त्यांना प्रशिक्षणार्थी असे म्हणतात.

विद्यार्थी

कोणतीही गोष्ट शिकत असलेल्या व्यक्तीला विद्यार्थी असे म्हणतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळेतील पहिली ते आठवी वर्गापर्यंत शिक्षण घेणारे अध्ययनार्थी म्हणजे विद्यार्थी होय.

बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तीगत सुरक्षा माहिती जाणून घेणारे अध्ययनार्थी म्हणजे विद्यार्थी होय.

अभिवृत्ती

एखाद्या व्यक्तीने एखाद्या प्रसंगी व्यक्त होतांना त्यांच्या मुल्यांचा केलेला वापर म्हणजे अभिवृत्ती.

व्यक्तिगत सुरक्षा

आपल्या खाजगी अवयवांची काळजी घेणे म्हणजे व्यक्तिगत सुरक्षा होय.

प्रशिक्षण

एखाद्या विशिष्ट कामासाठी प्रशिक्षणार्थ्यांचे ज्ञान आणि कौशल्य वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे प्रशिक्षण होय.

परिणामकारकता

परिणामकारकता म्हणजे अचूक आीण योग्य ते काम करणे आपल्या अधवा एखादयाउपक्रमाचा धनात्मक प्रभाव होय. - सर ॲटनी जे

अध्यापन परिपाक म्हणून पूर्व निश्चित उदिदष्टाप्रत विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती म्हणजेच परिणामकारकता होय. - ह. ना. जगताप

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात विद्यार्थ्यांना प्रशिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनानंतर प्राप्त प्रशिक्षकांच्या पुर्व व उत्तर चाचणीतील गुणांची तुलना केल्यानंतर गटाच्या संपादनात असलेला फरक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणाची परिणामकारकता होय.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षकांना प्रशिक्षणार्थीनी केलेल्या मार्गदर्शना नंतर प्राप्त प्रशिक्षकांच्या पुर्व व उत्तर चाचणीतील गुणांची तुलना केल्यानंतर गटाच्या संपादनात असलेला फरक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणाची परिणामकारकता होय.

अभ्यास

एखादया विषयाची अंर्तबाहय ओळख व त्याचे सखोल ज्ञान प्राप्ती म्हणजे अभ्यास होय.

प्रस्तुत संशोधनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेल्या परिणामाचा अभ्यास म्हणजे अभ्यास होय.

४. संशोधनाची उद्दिष्टये

१. बाललैंगिक शोषण प्रशिक्षणाचा परिणाम अभ्यासणे.

२. बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व वैयक्तिक सुरक्षा संदर्भात प्रशिक्षकांच्या अभिवृत्तीचे मापन करणे.

३. बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व वैयक्तिक सुरक्षा संदर्भात प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या अभिवृत्तीचे मापन करणे.

४. बाललैंगिक शोसणास प्रतिबंध व वैयक्तिक सुरक्षा संदर्भात विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीचे मापन करणे.

५. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेला परिणाम अभ्यासणे.

५. संशोधनाची परिकल्पना

१. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षणार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा सकारात्मक परिणाम होतो.

२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थ्यांनी शिकाविल्या नंतर सकारात्मक परिणाम होतो.

३. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती अभ्यासणे.

४. बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व वैयक्तिक सुरक्षा प्रशिक्षणामुळे बालकाच्या व्यक्तीगत सुरक्षेत वाढ होईल.

५. बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तीगत सुरक्षा प्रशिक्षणामुळे वैयक्तिक सुरक्षेच्या नियमांची जाणिव जागृती होईल.

६. संशोधनाची शून्य परिकल्पना

१. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षणार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा लक्षणीय परिणाम होत नाही.

२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थ्यांनी शिकाविल्या नंतर लक्षणीय परिणाम होत नाही.

७. संशोधनाची गृहितके

१. बाललैंगिक शोषणास प्रतिबंध प्रशिक्षण विद्यार्थी, पालक व समाज यांच्यासाठी उपयुक्त आहे.

२. सदरील प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची व्यक्तिगत सुरक्षा वृध्दीगंत होते.

३. विद्यार्थ्यांना शोषणाची लक्षणे शारिरीक, मानसिक व लैंगिक कोणती आहेत हे आत्मसात होते.

४. विद्यार्थ्यांना सुरक्षा नियम आत्मसात होतात.

५. विद्यार्थ्यांच्या मनातील अपराधीपणा आणि लाज या बाबत भिती असते.

संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

संबंधित साहित्याचा आढावा

अ.क्र.	साहित्याचे नाव/शिर्षक	लेखक	प्रकाशन व वर्ष
१	NCERT	राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५	राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, दिल्ली २००६
२	SCERT	राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०	महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुण २०१०
३	'शैक्षणिक मूल्यमापन'	भाळवनकर	पुणे, सुविचार प्रकाशन, २००५
४	'शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र'	वा.ना.दांडेकर	पुणे, श्रीविदया प्रकाशन, १९९७
५	कदाम, चा. पा.	शैक्षणिक संख्याशास्त्र	पुणे, नुतन प्रकाशन १९९९
६	कायंदेपाटील, ग. वि.	संशोधन पध्दती'	नाशिक, चैतन्य प्रकाशन २००६
७	'कृतीसंशोधन व नवोपक्रम'	पाटील वा. भा	लातूर, संस्कार प्रकाशन
८	'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे'	मूळे, उमाठे	औरंगाबाद, विदया बुक्स प्रकाशन, १९९८
९	पारसनिस, हे	शैक्षणिक संशोधन' (ओळख)	पुणे, नित्यनुतन प्रकाशन २००८
१०	पारसनिस, हे	'शैक्षणिक संशोधन' (नमुना निवड)	पुणे, नित्यनुतन प्रकाशन २००८
११	पारसनिस, हे	'शैक्षणिक संशोधन' (माहिती संकलन तंत्रे व साधने)	पुणे, नित्यनुतन प्रकाशन २००८
१२	मूळे, रा.श. व उमाठे वि.तु	'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे'	नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथ निर्मीती मंडळ बुक्स प्रकाशन १९८७
१३	भिंताडे, वि.रा.	'शैक्षणिक संशोधन पध्दती'	पुणे, नित्यनुतन प्रकाशन २००८
१९	हकीमे, प्र.	'शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र'	पुणे, नित्यनुतन प्रकाशन २००८
२०	पंडित, ब.बी.	'शिक्षणातील संशोधन'	पुणे, नित्यनुतन प्रकाशन २००८
२१	पंडित, ब.बी. व मोरे, ल. व.	'शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परिक्षीकांचा उपयोग'	नागपूर, पिंपळापुरे ॲड कं. पब्लिशर्स
२२	Best¸ J.W. and Khan, J. V.	Research in Education(9th Ed).	New Delhi, Prentice Hall of India' 2006

८. संशोधनाची गरज

अभ्यासक्रम् पाठ्यक्रम् अध्ययन् अध्यापन व शैक्षणिक व्यवस्थापणात नवनवीन ज्ञानाची पर्याप्तता् अभ्यासक्रम व पाठयक्रमाच्या अंमलबजावणीचा परिणाम् शैक्षणिक समस्यांचे निराकरण् शिक्षण प्रक्रियेतील शास्त्रीय दृष्टीकोण् शैक्षणिक धोरणांची निर्मिती व परिणाम् शिक्षण प्रक्रियेला गतिमानता देणे् शिक्षण प्रक्रियेत व शैक्षणिक परिस्थीतीत आवश्यक सकारात्मक बदल करणे तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी संशोधन करणे गरजेचे

आहे.जागतीक आरोग्य संघटनेनुसार जगातील सर्वात जास्त बाललैंगिक शोषितांची संख्या भारतामध्ये आहे. हयामध्ये ० ते १८ वयोगटातील मुलांचा समावेश होतो.

भारतातील आकडेवारी नुसार प्रत्येक दुसरं मुल हे लैंगिक शोषणाला बळी पडतं असते. मुळात लैंगिक शोषण हे स्पर्शित आणि अस्पर्शित अशा २ प्रकारात होत असते. आणि त्याचे परिणाम म्हणजे मुले नैराश्याच्या जाळ्यात ओढली जावू शकतात. समाजापासून दूर होवू शकतात आणि त्यांना कोणावरही विश्वास ठेवणे कठीण जावू शकते अशावेळी शाळेमार्फत वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाचा अभिनव कार्यक्रम घेतला जावू शकतो. कारण शाळा ही मुलांच्या जिवनाचा अविभाज्य घटक आहे.

लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा-२०१२ (POCSO ACT) पोक्सो कायदा हा बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी आणि अशा घटनातील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी भारत सरकारने २०१२ साली तयार केलेला कायदा आहे. पोक्सो हे प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्युअल ओफेन्सेस चे लघुरुप आहे.

कायदेशीर प्रक्रियेच्या दरम्यान प्रत्येक टप्प्यावर मूलांच्या हिताचे संरक्षण करुन लैंगिक हल्ले लैंगिक छळ आणि पोर्नोग्राफी अशा प्रकारच्या गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट पुरवण्याकरता लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ तयार करण्यात आला. हा कायदा करतांना बालक प्रथम या तत्वाचा अंगिकार करण्यात आला. यामध्ये मुलांना त्रास होणार नाही अशा पध्दतीने अहवाल देणे पुराव्याची नोंद करणे आणि खास नेमण्यात आलेल्या विशेष न्यायालयांच्या मार्फत जलदगतीने खटले चालवणे याचा समावेश करण्यात आला आहे. या कायद्याव्दारे विविध प्रकारच्या गुन्हयांसाठी गुन्हेगारांना शिक्षा करता येईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. यामध्ये बालकांचा विनयभंग हा सुध्दा गुन्हा ठरवण्यात आला आहे. हा कायदा लिंग उदासीन आहे. तो मुलगा आणि मुलगी दोघानांही लागु होतो. पोर्नोग्राफीच्या संदर्भात बालकांचा समावेश असलेली पोर्नोग्राफी पाहणे किंवा जवळ बाळगणे हा सुध्दा या कायद्याने गुन्हा ठरवला आहे.

केवळ अत्याचार करणाराच नव्हे तर अत्याचाराची माहिती असूनही तक्रार दाखल न करणारी व्यक्ती सुध्दा या कायद्याव्दारे गुन्हेगार मानण्यात आलेली आहे.

आजच्या धावपळीच्या जगात पालक नेहमी आपल्या मुलांसोबत राहू शकत नाहीत. पालक आणि मुलांमध्ये संवादाचा अभाव जाणवतो. त्यामुळे पालक मुलांच्या दैनंदिन घडामोडी समजू शकत नाहीत. अनेक पालक पाल्यांच्या लैंगिक शोषणाविषयी अनभिज्ञ असतात. त्यांनी पाल्याला शरीराच्या खाजगी अवयांविषयी माहिती दिलेली नसते. जर कुणी मुलांबरोबर काही अनुचित प्रकार केला तर त्यांना काय करावे हे कळत नाही. ते डिप्रेशन मध्ये जातात. ते आपल्या सोबत झालेला प्रकार सांगण्यास धजावत नाहीत. हा झालेला प्रकार आई-वडिल किंवा विश्वासू व्यक्तीला कसा सांगावा हा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतो. बाललैंगिक शोषणाबद्दल मुलांना माहिती देणे आवश्यक आहे. म्हणून सदरील विषयावर संशोधनांची गरज आहे.

१. पालक

पाल्याच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२. विद्यार्थी

विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

३. शिक्षक

शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी काळजी घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

३.मुख्याध्यापक

मुख्याध्यापक अथवा प्राचार्याना विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी आवश्यक कार्यवाही व प्रक्रिया राबवण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

४. संस्थाचालक

संस्थाचालकांना विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी आवयश कार्यवाही करण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

५. शिक्षण नियोजन विभाग

शिक्षण विभागाला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी साधन सामग्रीची उपलब्धता करण्यासाठी व त्याचा वापर करून अचूक, नेमके नियोजन व धोरण ठरविण्यासाठी तसेच मार्गदर्शन मिळण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

६. शैक्षणिक धोरण समिती

शैक्षणिक धोरण समितीला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी विषयक वापर व उपयोग करण्यासाठी शैक्षणिक धोरण व त्याची निश्चित दिशा ठरविण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

७. केंद्रशासन

केंद्रशासनाला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी संदर्भात केंद्रपातळीवर देशाच्या विकासासाठी शैक्षणिक धोरण व त्याची निश्चित दिशा ठरविण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

८. राज्यशासन

राज्यशासनाला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षे संदर्भात राज्यपातळीवर देशाच्या विकासासाठी शैक्षणिक धोरण व त्याची निश्चित दिशा ठरविण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

९. सेवभावी संस्था

सेवाभावी संस्थाना विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी विविध साधनांचे वाटप व सामाजिक मदत करण्यासाठी धोरण व त्याची निश्चित दिशा ठरवून समाजाला अधिक फायदा देण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

१०. लेखक

लेखकाला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी माहिती तयार करणे व तिचा वापर करण्यासाठी आपल्या लेखनाचा अधिक फायदा समाजाला देण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

११.शिक्षणतज्ञ

शिक्षणतज्ञांला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी विविध उपक्रम सूचविण्यासाठी व नविन उपक्रम निर्मितीसाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

९. संशोधनाचे महत्त्व

शैक्षणिक प्रक्रियेचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे शैक्षणिक संशोधन होय. शैक्षणिक प्रगती, शिक्षण क्षेत्रात कालसुसंगत बदल घडून आणणे, समस्या निराकरण, जुन्या संकल्पनांना नवीन अर्थ प्राप्त करून देणे, शैक्षणिक प्रक्रियेला नवीनता प्रदान करणे, गतीमानता देणे व ज्ञान शाखेत ज्ञानाची वृध्दी करणे यासाठी शैक्षणिक संशोधन महत्त्वाचे ठरते.

१. **पालक** : प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेची माहिती व उपयोग पालकांना समजेल ज्यामुळे पाल्याचे संरक्षणासाठी पालक जागृत होतील व पालकांना सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल.

२. **विद्यार्थी**: प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे विद्यार्थी विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी सोयीनुसार निर्णय घेण व काळजी घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळण्यासाठी सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल.

३ . **शिक्षक** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून काळजी घेण्यासाठी शिक्षकांना सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

४ . **मुख्याध्यपक** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे मुख्याध्यापक अथवा प्राचार्याना विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी आवश्यक साधन सामग्रीची उपलब्धता करण्यासाठी व त्याचा वापर करून प्रभावी प्रक्रिया राबवण्यासाठी मुख्याध्यपकांना सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

५ . **संस्थाचालक** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे संस्थाचालकांना अपल्याकडे असलेल्या विविध विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी उपलब्ध साधन सामग्रीची उपलब्धता करण्यासाठी व त्याचा वापर करून प्रभावी वापरकरण्यासाठी संस्थाचालकांना सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

६ . **शिक्षण विभाग नियोजन** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे शिक्षण विभागाला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी आवश्यक साधन सामग्रीची उपलब्धता करण्यासाठी व त्याचा वापर करून अचूक, नेमके नियोजन व धोरण ठरविण्यासाठी तसेच मार्गदर्शन मिळण्यासाठी सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

७ . **शैक्षणिक धोरण समिती** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे शैक्षणिक धोरण समितीला विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षे संदर्भात आवश्यक साधनांचा वापर व उपयोग करण्यासाठी तसेच शैक्षणिक धोरण व त्याची निश्चित दिशा ठरविण्यासाठी शैक्षणिक धोरण समितीला सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

८ . **केंद्रशासन** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी कायदा निर्माण करण्यासाठी व सुविधांचा वापर व उपयोग करण्यासाठी केंद्रप्रतळीवर देशाच्या विकासासाठी शैक्षणिक धोरण व त्याची निश्चित दिशा ठरविण्यासाठी केंद्रशासनाला सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

९ . **राज्यशासन** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी कायदा निर्माण करण्यासाठी व वापर व उपयोग करण्यासाठी राज्यप्रतळीवर देशाच्या विकासासाठी शैक्षणिक धोरण व त्याची निश्चित दिशा ठरविण्यासाठी राज्यशासनाला सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

१० . **सेवभावी संस्था** ः सेवाभावी संस्थाना प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसाठी साधनांचे वाटप व सामाजीक मदत करण्यासाठी धोरण व त्याची निश्चित दिशा ठरवून समाजाला अधिक फायदा देण्यासाठी सेवाभावी संस्थाना सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

११ . **संशोधक** ः प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षामुळे विद्यार्थ्यांच्या बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षेसंदर्भात नवीन संशोधन हाती घेण्यासाठी संशोधकांना सदर संशोधन मार्गदर्शक ठरेल .

१० . संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१ . काल ः

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधन हे सर्व कालखंडासाठी लागू राहतील .

मर्यादा ः प्रस्तुत संशोधन हे २०२३ ते २०२६ पर्यत मर्यादित आहे .

२ . आशय ः

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधन निष्कर्ष हे सर्व विषयांसाठी लागू राहतील .

मर्यादा ः प्रस्तुत संशोधन हे भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेल्या परिणामाचा अभ्यासा पुरतेच मर्यादित आहे .

३ . माध्यम ः

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधन निष्कर्ष हे सर्व माध्यमांसाठी लागू राहतील .

मर्यादा ः प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमापुरतेच मर्यादित राहतील .

४ . भौगोलीक

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधन निष्कर्ष हे सदर संशोधनाचे निष्कर्ष हे सर्व शाळांना लागू राहतील .

मर्यादा ः प्रस्तुत संशोधन हे नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्हातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेपुरतेच मर्यादित राहतील.

५. शाळा

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधन निष्कर्ष हे सर्व शाळांना लागू राहतील.

मर्यादा ः प्रस्तुत संशोधन हे नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्हातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेपुरतेच मर्यादित राहतील.

६. विद्यार्थी

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे सर्व विद्यार्थ्यासाठी लागू राहतील.

मर्यादा ः प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्हातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेतील विद्यार्थ्यापुरते मर्यादित राहतील.

७. प्रशिक्षक

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे सर्व प्रशिक्षकांना लागू राहतील.

मर्यादा ः प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्हातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेशी निगडीत प्रशिक्षकांपुरते मर्यादित राहतील.

८. निष्कर्ष

व्याप्ती ः प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी साठी लागू राहतील.

मर्यादा ः प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्हातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेतील विद्यार्थी, प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थ्यापुरते मर्यादित राहतील.

संशोधनाच्या परिमर्यादा

प्रस्तुत संशोधन हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांची अभिवृत्ती आणि प्रशिक्षणाचा झालेल्या परिणामाचा अभ्यास या संशोधन समस्येपुरते मर्यादित आहे तसेच प्रस्तुत संशोधनात नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्हातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेतील विद्यार्थी, प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थ्यापुरते मर्यादित आहे.

११. संशोधन कार्यपध्दती

कोणत्याही कार्याची सुरुवात सुयोग्य पध्दतीने व पुर्वनियोजीत पध्दतीने करणे आवश्यक असते. संशोधन करते वेळेस बऱ्याच गोष्टींचा मेळ घालावा लागतो. यात संशोधन उद्दिष्टे, महत्व, माहिती संकलन, संशोधनाची कार्यक्षेत्र, मर्यादा, इत्यादी बाबींना एकत्र करून विशीष्ट क्रम पध्दतीने त्याची रचना करावी लागते.

सदरील संशोधनामध्ये संशोधक सर्वेक्षण पध्दतीचा प्रामुख्याने उपयोग करणार आहे, कारण सर्वेक्षण पध्दती ही सदस्यः स्थिती व वर्णन करण्यास उपयुक्त ठरे उपयुक्त ठरते. तसेच त्याव्दारे सखोल व सविस्तर माहिती मिळविता येते.

१२. संशोधनाची पध्दती

वर्तमान अवस्था, सद्यःस्थिती यांच्या अभ्यासासाठी जी पध्दती वापरली जाते त्या पध्दतीला सर्वेक्षण पध्दती असे म्हणतात, प्रचलित पध्दत, दृष्टीकोन, वाटचाल व परिणाम यांचा अभ्यास या पध्दतीत होतो. सर्वसामान्य परिस्थितीचा विचार ही पध्दत करते. या पध्दतीत मिळालेल्या माहितीचे व्यवस्थित संघटन विश्लेषण आणि अर्थ निर्वचन केले जाते. वर्तमानाच्या मोठ्या घटकांकडून ही माहिती मिळविणे हा या कार्यपध्दतीचा महत्वाचा गुणधर्म आहे. मात्र सर्व घटकांचा (जनसंख्या) समावेश

माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेत केला जात नाही. जनसंख्येतील सर्व स्तरावरील घटक छोटया नमून्यात म्हणजे न्यादर्शात येतील याची काळजी या पध्दतीत घेतली जाते. संशोधक ज्या कालावधीत माहिती संकलित करणार तो कालावधी वर्तमानाचे वर्णन करण्याऐवढा पुरेसा असावा लागतो. समूहातील वस्तू किंवा घटक यांचा स्वतंत्रपणे विचार न होता समुहाचा एकत्रितपणे विचार केला जातो. त्यासाठी सांख्यिकीचा वापर केला जातो.

संशोधक संशोधनासाठी प्रश्नावली तयार करुन प्रश्नावलींचा वापर संशोधनाची माहिती गोळा करण्यासाठी करणार आहे.

१३ . संशोधन अभिकल्प

समान दोन गट पुर्व चाचणी व अंतिम चाचणी हा संशोधन अभिकल्प संशोधनासाठी वापरण्यात येईल व बाललैंगिक सुरक्षा व व्यक्तीगत सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यात येईल.

१४ . संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली पुर्वचाचणी व उत्तर चाचणी या संशोधन साधनाचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची परिमाणे :-

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन 't' परिक्षका, आलेख, सरासरीचा संख्याशास्त्रीय परिमाणाचा परिकल्पना उकल करण्यासाठी व निष्कर्ष प्रस्तापित करण्यासाठी वापर करण्यात येईल.

१५ . माहितीचे संकलन, विश्लेषण, अर्थनिर्वचन

१ . कोष्टकीकरण : प्रतिसादकांचा प्रतिसाद वर्गीकरणाच्या बाबी यांचा विचार करून तयार करण्यात आले त्यात संख्यात्मक विश्लेषण केले . प्रतिसादकांचा प्रतिसाद व त्यांची टक्केवरी कोष्टकाच्या माध्यमातून नोंदवली जाईल .

२ . शेकडेवारी ः सर्वेक्षणातुन जी माहिती संकलीत केली आहे त्या महितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनासाठी शेकडेवारी हे संख्याशास्त्रीय तंत्र वापरले जाईल .

३ .'टी' परीक्षिकाः प्रस्तुत संशोधनात पूर्व व उत्तर चाचणीची तुलना करण्यासाठी 'टी' परीक्षकेचा वापर करण्यात येईल . मध्यमानातील फरकांची लक्षणीयता ०.०१ व ०.०५ या दोन स्तरांवर अभ्यासण्यात येईल .

१६ .संशोधन जनसंख्या

प्रस्तुत संशोधनात भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भातील आदर्श शाळांची संख्या : लातूर १०, हिंगोली ०६,

नांदेड २३, परभणी १९, एकूण ५८ शाळेतील ८ प्रशिक्षक, २०० प्रशिक्षणार्थी व ११६० विद्यार्थी ही संशोधनाची जनसंख्या असेल.

१७. संशोधनाचा न्यादर्श

प्रस्तुत संशोधनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भातील ५८ शाळेतील ८ प्रशिक्षक, २०० प्रशिक्षणार्थी व ११६० विद्यार्थ्यांचा नमुना म्हणून समावेश करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनाची नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधनात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत बाललैंगिक शोषणास प्रतिबंध व व्यक्तिगत सुरक्षा प्रशिक्षणा संदर्भात असलेल्या ५८ शाळेतील ८ प्रशिक्षक, २०० प्रशिक्षणार्थी व ११६० विद्यार्थ्यांचा सहेतुक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात येईल.

१७. प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधनाचे प्रकरणीकरण पुढील प्रमाणे करण्यात येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

पहिल्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, समस्या विधान, संशोधनाचे महत्व, व्याप्ती व मर्यादा या बाबत स्पष्टीकरण केले जाईल.

प्रकरण दुसरे : संबंधित साहित्याचा आढावा

दुसऱ्या प्रकरणामध्ये संबंधित संशोधन साहित्य व संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : संशोधन कार्यपध्दती

तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधनाची कोणती कार्यपध्दती वापरण्यात येणार ? का येणार? या संबंधी तात्वीक व प्रत्यक्ष कार्यपध्दतीचा आढावा घेण्यात येईल. संशोधन कार्याकरीता वापरण्यात आलेली कार्यपध्दती तसेच संशोधनाची साधने स्पष्ट करण्यात येतील, संशोधन साधना संबंधी चर्चा या प्रकरणात करण्यात येईल व संशोधनाची साधने स्पष्ट करण्यात येतील व संकलीत माहितीची मिमांसा करण्यात येईल.

प्रकरण चौथे : माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

या प्रकरणात संशोधन साधनांचा वापर करुन प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात येईल, तक्त्यांचा व आलेखांचा वापर करण्यात येईल. तक्त्यावरुन व आलेखावरुन अर्थनिर्वचन करणे सोईचे होईल.

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात सुरुवातीला संपूर्ण संशोधनाचा आढावा प्रकरण एक ते चारचा संक्षिप्तपणे घेण्यात येईल. तो सारांश प्रत्येक मुद्याखाली लिहीण्यात येईल. प्रस्तुत संशोधनात संशोधनाअंती प्राप्त झालेले समग्र निष्कर्ष सांराशा पाठोपाठ घेतले जातील. या निष्कर्षावरुन शिफारसी केल्या जातील.

१८. संदर्भ ग्रंथ यादी

आगलावे, प्र. (२०००). संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे (प्रथमावृत्ती). नागपूर: विद्या प्रकाशन.

पिचड न व बरकले रा. (२००५). अध्यापनशास्त्रीय विश्लेषण (द्वितीयावृत्ती). नाशिक : इनसाईट प्रकाशन.

उपासनी, ना. के. (१९८४). अध्यापान साधन (प्रथमावृत्ती). पुणे: श्री. विद्या प्रकाशन.

कदम, श. प. (१९८९). शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणे: नूतन प्रकाशन.

जगताप, ह. ना. (१९९८). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र (द्वितीयावृत्ती). पुणे: नूतन प्रकाशन.

दांडेकर, वा. ना. (१९९७). शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र (पाचवी आवृत्ती). पुणे: श्री. विद्या प्रकाशन.

दुनाखे, अ. (२००२). इतिहास अध्यापन पद्धती ,पुणे: नुतन प्रकाशन.

पंडित, ब. बि. (१९८९). शिक्षणातील संशोधन अभिकल्प (प्रथमावृत्ती). पुणे : नूतन प्रकाशन.

पाटील, वा. भा. (१९९९). संशोधन पद्धती. नागपूर: मंगेश प्रकाशन.

पंडित, ब. बि. (१९८९). शिक्षणातील संशोधन अभिकल्प (प्रथमावृत्ती). पुणे: नूतन प्रकाशन.

पंडित, ब. बि. (१९९७). शिक्षणातील संशोधन अभिकल्प (द्वितीयावृत्ती). पुणे : नूतन प्रकाशन.

भिंताडे, वि. रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रथमावृत्ती). पुणे: साकेत प्रकाशन.

भिंताडे, वि. रा. (१९९९). शैक्षणिक संशोधन पद्धती (द्वितीयावृत्ती). पुणे : नूतन प्रकाशन.

भिंताडे, वि. रा. (२०१०). शैक्षणिक संशोधन पद्धती (चतुर्थावृत्ती). पुणे : नूतन प्रकाशन.

म्हस्के, टी. ए. (१९८८). शैक्षणिक संख्याशास्त्र (प्रथमावृत्ती). पुणे: प्रज्ञा प्रकाशन.

मुळे, रा. व उमाठे, वि. (१९७७). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे (प्रथमावृत्ती). नागपूर : साहित्य प्रसार केंद्र.

मुळे, रा. व उमाठे, वि. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे (तृतीयावृत्ती). औरंगाबाद: विद्या बक्स्.

शेवतेकर-बडवे, शा. (२००४). विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र (प्रथमावृत्ती). नागपूर: विद्या प्रकाशन.

भांडारकर, के. म. (२००५). सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणे: नूतन प्रकाशन.

भिंताडे, वि. रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रथमावृत्ती). पुणे: साकेत प्रकाशन.

सोहनी, चि. (२००६). अध्यापनाची प्रतिमाने (प्रथमावृत्ती). पुणे: नित्य नूतन प्रकाशन.

Best , J. & Kahn, J. W. (2003). Research in Education. Bostan,MA: A Pearson Education Company

Garrett, H. E. (1985). Statistics in Psychology and Education(11th Ed.). Vakil, Feffer and Simsons Ltd.

Weiyyan, Z.& kirk P. (2003).Assessing Learning Styles in Distance Education , University of Jammu.Vol.10(I), page No.29

Garrett, H.E. (1985) Statistics in Psychology and Education (11thEd.). Bombay: Vakil's Reffer and Simons Ltd.

Kothari, C. R. (1991). Research Methodology-methods and techniques New Delhi: Wishwa Prakashan.

Krishnaswami, O.R. and Ranganathan, M. (2006). New Methodology of research in social Science (7th Ed.) Delhi: Himalaya Publishing House.

Koul, L. (1997). Methodology of educational research. New Delhi: Vikas Publishing House Pvt. Ltd.

NCERT, (2006). Sixth survey of Educational Research. Vol-1, (1993-2000).

Pandya, S (2010). Educational Research. Delhi: APH Publication.

Sharma, R. (1995): Fundamentals of Education research (1st Ed.). Meerut: International Publishing House.

Ahuja, Ram. (2006). Research Methods New Delhi: Rawat Publications.
Chauhan, S. (1996): Advanced Educational Psychology New Delhi: Vikas Publishing House.

Educational Surveys

Buch, M.B. (1978-1983) Third Survey Of Educational Research, New Delhi: NCERT.
Buch, M.B. (1983-1988) Fourth Survey Of Educational Research, New Delhi: NCERT
Buch, M.B. (1988-1992) Fifth Survey of Educational Research, Vol.I. New Delhi: NCERT
Buch, M.B. (1988-1992) Fifth Survey of Educational Research, Vol.II. New Delhi: NCERT

ज्ञानकोष

Guthrie, J.W. Encyclopedia of Education(2nd Ed.).P.C.M

शब्दकोष

वीरकर,के.बी. (१९९५).के.बी.वीरकर डिक्शनरी. (पस्तीसावी आवृत्ती).पुणे: अनमोल प्रकाशन
तावरे, स्ने. (२000). शुद्ध शब्दकोश (सुधारित आवृत्ती).पुणे : स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस.
सोहोनी, शं.कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश (प्रथमावृत्ती).पुणे : सुधा सोहनी.
Good, C.V. (1959). Dictionary of education. New York: McGraw-Hill Book Company.

माहिती पुस्तिका

१) बाल लैंगिक शोषण प्रतिबंध आणि प्रतिक्रिया (२०००) अर्पण संस्था मुंबई, हस्तपुस्तिका.
२) लैंगिक गुन्हापासून बालकांच संरक्षण कायदा २०१२-माहिती पुस्तिका.
३) बालकांचे हक्क व सुरक्षितता अर्पण पुस्तिका, मुंबई.

Website

http://edureseaech.dauniv.ac.in.
https://shodhganga.inflibnet.ac.in/
https://eric.ed.gov/
https://en.wikipedia.org/wiki/Main_Page
http://sanshodhanchetana.com/
http://www.unipune.ac.in/university_files/research.htm
https://infed.org/tag/experiential-learning/https://files.eric.ed.gov/fulltext/EJ1285034.pdf
https://files.eric.ed.gov/fulltext/EJ1192346.pdf

संशोधक | **मार्गदर्शक**
उज्जैन विठ्ठलराव पाईकराव | **डॉ. भाऊसाहेब सोपान आंधळे**